# <u>पदभरती जाहिरात</u>

*आरोग्य विभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी*

## <u>कंत्राटी तत्वावर बी.ए.एम.एस. वैद्यकिय अधिकारी पद भरती</u>

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी मध्ये जिल्हा परिषद स्वनिधीतून 06 बी. ए. एम. एस. वैद्यकिय अधिकाऱ्यांची निव्वळ कंत्राटी स्वरुपात 06 महिने कालावधी करीता करार तत्त्वावर थेट मुलाखतीव्दारे पद भरती करण्यात येणार आहे.

जाहिरातीतील घोषित रिक्त पदे :- 06

| अ.क्र. | तालुका | प्राथमिक आरोग्य केंद्राचे नाव | रिक्त पद | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | दापोली | उंबर्ले | 1 | |
| 2 | गुहागर | हेदवी | 1 | |
| 3 | संगमेश्वर | कडवई | 1 | |
| 4 | संगमेश्वर | फुणगुस | 1 | |
| 5 | लांजा | शिपोशी | 1 | |
| 6 | लांजा | वाडीलिंबू | 1 | |

उपरोक्त घोषित रिक्त पदांच्या संख्येत कमी किंवा जास्त बदल होण्याची शक्यता आहे. तसेच रिक्त पदांच्या ठिकाणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

### शैक्षणिक अर्हता :-

उमेदवार बी. ए. एम. एस. पदवी धारक किंवा तत्सम क्षेत्रातील उच्च शैक्षणिक पात्रता धारक असावा.

### वयोमर्यादा :-

उमदेवारांचे दिनांक 30/11/2017 रोजी वय १८ वर्षे पेक्षा कमी नसावे आणि खुल्या प्रवर्गातील उमेदवारांचे वय ३८ वर्षे पेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारांस नियमानुसार कमाल वयोमर्यादा शिथिलक्षम.

### मानधन :-

नियुक्त झालेल्या उमेदवारांस दरमहा एकत्रित मानधन रक्कम रुपये १६,०००/- (अक्षरी रुपये सोळा हजार मात्र) देण्यात येईल त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते, वेतन अनुज्ञेय असणार नाही.

### <u>अटी व शर्ती</u>

1. जाहिरातीतील घोषित पदांचे संख्येत कमी - जास्त बदल होण्याची शक्यता आहे.
2. उपरोक्त पदांचा नियुक्ती कालावधी अनुदानाचे उपलब्धतेनुसार कमी-जास्त होण्याची शक्यता आहे.
3. वैद्यकीय अधिकारी पदांची नियुक्ती तात्पुरत्या कंत्राटी स्वरुपाची म्हणजेच 2 महिने कालावधीसाठी असून वैद्यकीय अधिकाऱ्यांचे बाबतीत स्थायी, अस्थायी, बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी रुजू झाल्यास तात्पुरत्या (कंत्राटी) वैद्यकीय अधिकाऱ्यांस रत्नागिरी जिल्हयातील अन्य

प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदांवर नियुक्ती देण्यात येईल किंवा कोणतीही पुर्वसुचना न देता सेवा समाप्त करण्यात येईल.

4. नियुक्तीचेवेळी उमेदवारांस विहीत केलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे रुपये १०० च्या बाँडपेपरवर तहसिलदार किंवा नोटरी समोरील प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.
5. नियुक्ती देण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकारी यांनी सेवेत असताना गैरवर्तन, गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल व शासकीय नियमानुसार त्यांचेवर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.
6. नियुक्त झालेल्या वैद्यकीय अधिकारी यांना सेवेचा राजीनामा द्यावयाचा झाल्यास एक महिन्याची आगावू नोटीस दिल्याशिवाय राजीनामा देता येणार नाही. अन्यथा एक महिन्याचे मानधनाइतकी रक्कम शासन सदरी जमा करावी लागेल.
7. नियुक्त झालेल्या उमेदवारांस नियमित शासकीय सेवकाप्रमाणे इतर कोणत्याही सवलती मिळण्यास किंवा कायम सेवेबाबत हक्क मिळण्यास पात्र असणार नाही.
8. उमेदवारांची महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलकडे नोंदणी असणे आवश्यक आहे.
9. पात्र उमेदवारांपैकी स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.
10. भरती प्रक्रियेतील सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांना राहतील व त्यांचे निर्णय अंतिम राहतील.

## उमेदवारांने अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-

1. विहीत नमुन्यातील अर्ज सादर करणे बंधन कारक आहे.
2. अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे / गुणपत्रके जोडणे आवश्यक आहे.
3. अर्जात अनुभव नमूद केल्यास त्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांचे अनुभवाचे प्रमाण जोडणे आवश्यक .
4. उमेदवार विवाहीत असल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञा पत्र) नियम २००५ अन्वये जोडणे आवश्यक.
5. महाराष्ट्र राज्यातील रहिवाशी असल्याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.
6. जन्म तारखेसाठी स्थानिक स्वराज्य संस्थेने दिलेला जन्म दाखला / शाळा सोडलेचा दाखला / शालांत परिक्षा प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
7. उमेदवारांने मेडीकल कौन्सिलकडे नोंदणी केलेचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
8. उमेदवाराच्या नावांत बदल झाला असल्यास, त्या पृष्ठयर्थ शासन राजपत्राची प्रत जोडणे आवश्यक.

## उमेदवारांची निवड प्रक्रिया :-

1. उमेदवारांची निवड थेट मुलाखतीव्दारे करण्यात येईल.
2. मुलाखतीत प्राप्त गुणानुक्रमांनुसार उमेदवारांची अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करणेत यईल.

**अ) अर्जदाराने विहीत नमुन्यातील अर्ज ए-4 आकाराच्या कागदावर करावयाचा आहे. तसेच अर्ज परिपुर्ण भरलेला असणे बंधनकारक आहे. अर्जाच्या उजव्या कोपऱ्यात पासपोर्ट साईज फोटो चिकटविणे व अर्जावर उमेदवाराची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.**

1. **अर्ज स्वीकारण्याची कालावधी** : दिनांक 09**/**01/**201**8 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 12.00 पर्यंत
2. **अर्ज व कागदपत्र पडताळणी दि. 09/01/2018 रोजी दुपारी 12.00 ते दुपारी 1.30 वाजेपर्यंत.**
3. **मुलाखतीचा दिनांक :09/01/2018 वेळ दुपारी 03.00 वाजता.**
4. **मुलाखतीचे ठिकाण : श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, 3रा मजला, जिल्हा परिषद रत्नागिरी.**

सदरची भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे अथवा पूर्ण रद्द करण्याचे अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवलेले आलेले आहेत.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(डॉ.अनिरूध्द आठल्ये)** | **(श्री.आर.के.बामणे)** |
| **जिल्हा आरोग्य अधिकारी** | **मुख्य कार्यकारी अधिकारी** |
| **जिल्हा परिषद रत्नागिरी** | **जिल्हा परिषद रत्नागिरी** |

# <u>अर्जाचा नमुना</u>

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी येथील <u>कंत्राटी बी. ए. एम. एस. वैद्यकीय अधिकारी</u> पदांसाठी अर्ज.

१. उमेदवाराचे नांव :-..................................................................................................

२. जन्म दिनांक :-.......................................................................लिंग:-.............................................

३. उमेदवाराचे दिनांक 30/11/2017 रोजीचे वय :- ...........वर्षे ..........महिने...........दिवस.

४. उमेदवारांचा पत्ता:-.........................................................................................................
..................................................................................................................................................
..................................................................................................................................................

संपर्क क्र.......................................इमेल आयडी..............................................................

५. शैक्षणिक अर्हता.:-

| अ. क्र. | शैक्षणिक पात्रता (पदवीपासून पुढील नमूद करावी) | उत्तीर्ण होण्यासाठी केलेले प्रयत्न | विद्यापिठाचे नांव | प्राप्त गुण | अधिकत्तम गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

६. महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलकडे नोंदणी केली आहे काय? .........नोंदणी क्र................ व ता............

७. अनुभव:-

| अ. क्र. | कार्यालयाचे नांव | पदाचे नांव | अनुभवाचा कालावधी | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | वर्षे / महिने | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

उपरोक्त अर्जात नमूद माहिती खरी व बरोबर असून सदरची माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास प्रशासकीय कारवाईस पात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

आपला / आपली विश्वासु,

(नांव..................................................)

---

कार्यालयीन कामकाजासाठी

अर्ज पात्र / अपात्र आहे. कारण...............................................................................................